॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.३ (    ) विद्यार्थ्यांच्या उद्योजकीय कल्पना विकसित करण्यासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात इन्क्युबेशन सेंटर सुरु होणार असून या केंद्रासाठी विद्यापीठाला महाराष्ट्र शासनाकडून पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकसन व उद्योजकता विभागाच्या अंतर्गत महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटीकडून स्टार्टअप अंतर्गत नाविन्यपूर्ण उद्योगांना चालना मिळावी यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून इन्क्युबेशन सेंटर सुरु करण्यासाठी विद्यापीठांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील व प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली या केंद्राचा सविस्तर प्रस्ताव तयार करुन राज्य शासनाकडे सादर केला होता. यासंदर्भात प्रा.भूषण चौधरी व प्रा.व्ही.व्ही.गिते यांनी या प्रस्तावाचे सादरीकरण केले होते. राज्य सरकारकडे प्राप्तझालेल्या प्रस्तावाची छाननी झाली. महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी, महाराष्ट्र शासन यांच्याकडून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला या केंद्रासाठी पाच कोटी रुपयाचा निधी मंजूर झाला. विद्यापीठ स्वतःच्या निधीतून या केंद्रासाठी एक कोटी रुपये टाकणार आहे. बुधवारी राज्यपाल श्री.सी.विद्यासागर राव यांच्या हस्ते व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत इरादापत्र देण्यात आले.यावेळी शिक्षणमंत्री विनोद तावडे उपस्थित होते. विद्यापीठाच्या वतीने प्रा.भूषण चौधरी यांनी हे पत्र स्वीकारले.

विद्यापीठातील जैवशास्त्र प्रशाळेच्या नवीन विस्तारीत इमारतीत १० हजार स्क्वेअर फुट जागेवर हे केंद्र सुरु होणार आहे. खानदेशातील उद्योगाच्या गरजा लक्षात घेवून उद्योजक घडविण्यासाठी या केंद्राची मदत होईल. नवउद्योजकांना उद्योग सुरु करण्यासाठी प्रशिक्षण, तंत्रज्ञान, काही प्रमाणात कर्ज व तज्ज्ञांचे मार्गदर्शन दिले जाणार आहे. हे नवउद्योजक प्रायोगिक तत्वावर आपले उत्पादन या केंद्रात तयार करु शकतील. तीन ते पाच वर्षात या केंद्रातून तयार झालेले विद्यार्थी स्वतःच्या पायावर उभे राहून उद्योग उभारु शकतील. संशोधन करणाऱ्या व नवीन उद्योग टाकू इच्छिणाऱ्या खानदेशातील विद्यार्थ्यांना या केंद्राचा फायदा होणार असून यासंदर्भात विद्यापीठाकडून प्रस्ताव मागविले जाणार आहेत. विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पना विकसित करण्यासाठी योग्य ते प्रशिक्षण दिले जाईल तसेच त्यांचे स्टार्टअप ज्या क्षेत्राशी निगडित आहे. त्या क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन, बाजारपेठेशी त्यांना जोडणे आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे अशा काही सुविधा केंद्राकडून उपलब्ध करुन दिल्या जातील. स्टार्टअप धोरणाच्या अनुषंगाने रसायन तंत्रज्ञान, आयुर्वेद, केळी उपयोगी उद्योग, प्लॅस्टीक उद्योग, ललित कला अशा काही क्षेत्रांशी निगडीत विद्यापीठाने योजना तयार केल्या आहेत.

---

जा.क्र. : कबचौउमवि/१६/हस्तदेय /२०१८ दिनांक : ४ ऑक्टोबर, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी